# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- ५/२२** **दिनांक :- ०३/०१/२०२२**

## वाहनचोरी व इतर गुन्हयामध्ये ४ आरोपीतांना अटक करुन ४ गुन्हे उघडकीस करण्यास पेल्हार पोलीस ठाण्यास यश.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २२/१२/२०२१ रोजी १७.३० वा. ते दिनांक २३/१२/२०२१ रोजी ०९.३० वाजेचे दरम्यान भानोबा एंटरप्रायझेस, परमार टेक्नो ए. के. इंडस्ट्रियल, वसई फाटा, ता. वसई, जि. पालघर येथे फिर्यादी यांचे मालकीचा कंटेनर क्रमांक एम.एच.४८/ए.वाय.६८१५ हा उभा करुन ठेवलेला असतांना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने कंटेनरच्या दोन्ही बॅटरी चोरी करुन चोरुन नेले बाबत फिर्यादी नामे. श्री. शुभम रविंद्र सिंग, वय-२७ वर्षे, रा. मोरेगाव, नालासोपारा (पु.) यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतांवर पेल्हार पो.स्टे. येथे गु.रजि.नं. I १७९/२०२१ भा.दं.वि.सं.कलम-३७९ प्रमाणे दिनांक २४/१२/२०२१ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळावरील तांत्रिक बाबी व गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपी नामे. १) मोहम्मद लतीफ अबुसहम शेख्र, वय- २६ वर्षे, रा. वाकनपाडा, नालासोपरा पुर्व, २) तजंमुल हुसेन अहमद हुसेन वय-२६ वर्षे, रा. वाकनपाडा, नालासोपरा पुर्व यांना दिनांक २९/१२/२०२१ रोजी अटक करुन त्यांचेकडून बॅटऱ्या, टायर, गॅस बाटला असा एकुण- १९,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच त्यांनी पेल्हार पोलीस ठाणे कडील दाखल गु.रजि.नं. I १०९/२०२१ व भा.दं.वि.सं. कलम- ३७९ व गु.रजि.नं. I १५३/२०२१, भा.दं.वि.सं. कलम-३७९ प्रमाणे दाखल गुन्हयाची कबुली दिल्याने सदरील गुन्हे उघडकीस आले आहे.

तसेच दुसऱ्या घटनेमध्ये फिर्यादी यांचे गाळयाचे लोखंडी शटर उचकटून त्यावाटे आत प्रवेश करुन फिर्यादी यांना लाकडी दांडक्याने व ठोश्याबुक्यांनी मारहाण करुन तेथील मोबाईल, घरगुती गॅसच्या दोन टाक्या व रोख रक्कम असा माल जबरदस्तीने घेवुन गेल्याबाबत पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. I ०२/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३९४, ४५८, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयातील आरोपीत नामे १) शाहआलम बद्रीआलम चौधरी २) साहिल इनायत शाह यांना अटक करणेत यश मिळविले आहे. नमुद आरोपीत यांचेकडून खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, पोना/तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, किरण आव्हाड, बालाजी गायकवाड, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.